# नियमित दिवाणी दावा क्र. १४८/२०२१ मधील निशाणी क्र.३२ वरील आदेश
## हरी जैन वि. श्रीरंग कोकरे

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता, आदेश ३९, नियम ७ अन्वये दावा मिळकत व प्रतिवादी यांची मिळकत यांची पाहणी करुन तसा अहवाल, दाखल करणेबाबत न्यायालयीन आयुक्त यांची नेमणूकीसाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींच्या अर्जातील कथनांनुसार, वादीने दावा मिळकतीची मालकी जाहिर करुन मिळणेसाठी व निरंतर ताकिदीसाठी दावा दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. दावा मिळकतीची सत्य परिस्थिती न्यायालयासमोर येण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जात नमूद केलेल्या मुद्दयानुसार दावा मिळकत, प्रतिवादींची मिळकत व उचेठाण–मंगळवेढा डांबरी रस्ता याबाबतची वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यासाठी योग्य त्या इसमाची नेमणुक करुन त्याबाबतचा अहवाल अभिलेखावर दाखल करण्याबाबतचा आदेश करण्यात यावा, अशी विनंती केलेली आहे.

३. वादी यांनी सदर अर्जावर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास विरोध दर्शविला. वादी यांच्या कथनानुसार, प्रतिवादी यांना त्यांचे अर्जातील कथने शाबीत करण्यास पूर्ण संधी आहे. प्रतिवादी हे त्यांच्या कैफियतीतील मजकूर अशा प्रकारच्या अहवालाद्वारे दुरुस्त शकत नाही. अशा प्रकारच्या अहवालावर सदर पाहणी करणा–या इसमास साक्षीदार म्हणून तपासता येणार नाही. तरी सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेख पाहिला. वादीने सदरचा दावा वादी हा दावा मिळकतीचा मालक आहे, असा ठराव होवून मिळणेबाबत, निरंतर व आज्ञार्थी मनाईसाठी दाखल केलेला आहे. दाव्याकामी तुर्तातूर्त मनाई अर्ज प्रलंबित असताना प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम ७ मधील तरतुदीनुसार, तुर्तातूर्त मनाई अर्जाच्या सुनावणीवेळी दावा मिळकतीचे संरक्षण व पाहणी करुन दावा मिळकतीच्या

सद्यस्थितीबाबत अहवाल अभिलेखावर दाखल करण्यासाठी न्यायालयास एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येते. प्रस्तुत प्रकरणामध्ये प्रतिवादी यांनी अर्ज दाखल करुन दावा मिळकत व प्रतिवादींची गट क्र. १५२ ही मिळकत यांच्या चर्तुःसिमा अभिलेखावर येण्यासाठी तसेच प्रतिवादीचे राहते घर, दुकान व पाण्याचे बोअर प्रतिवादीचे मालकीचे गट क्र. १५२ मध्ये आहे किंवा कसे, याबाबतची वस्तुस्थिती अभिलेखावर येण्यासाठी न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक करण्याची विनंती केलेली आहे. सदरचा दावा ठराव, आज्ञार्थी व कायम मनाई मिळणेसाठी दाखल असून, प्रतिवादी यांनी वादीची मालकी नाकारलेली नाही. प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमध्ये दावा मिळकतीच्या चर्तुःसिमा चुकीच्या असल्याचे नमूद केले आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी हे त्यांच्या कब्जातील घर, दुकान व पाण्याचे बोअर हे त्यांच्या गट क्र. १५२ मध्ये आहे किंवा कसे, याबाबतची वस्तुस्थिती न्यायालयासमोर आणू पाहत आहेत. अशा परिस्थितीत, दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश ३९ नियम ७ प्रमाणे प्रतिवादी यांनी केलेली मागणी मान्य करता येणार नाही. अशा परिस्थितीत, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करता येणार नाही. सबब, खालीलप्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

प्रतिवादी यांचा अर्ज नि.क्र. ३२ नामंजूर करण्यात येत आहे.

MEGHA SHASHIKANT MALI Digitally signed by MEGHA SHASHIKANT MALI Date: 2025.09.25 11:22:01 +0530

(एम. एस. माळी)

दिनांक – २४/०९/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, मंगळवेढा

# **CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order is same word to word, as per the original Order.

(a) Name of the Stenographer : P.T. Jadhav

(b) Name of the Court : Jt. C.J.J.D, Mangalwedha, Dist. Solapur,

(c) Order signed by P.O. on : 24.09.2025.

(d) Order uploaded on : 24.09.2025.